Exampapers247

राज्यसेवा (मुख्य) परीक्षा - २०१६
परीक्षा दि. २४ सप्टेंबर, २०१६

2016

Exampapers247

CODE : **CO8**

# भाषा पेपर क्र.-1 / Language Paper - 1

**दर्जा : उच्च माध्यमिक शालांत परीक्षा** — **एकूण गुण : 100**

**Standard : H.S.C.** — **Maximum Marks : 100**

**प्रश्नपत्रिकेचे स्वरूप : पारंपरिक** — **कालावधी : 3 तास**

**Nature of Paper : Conventional type** — **Time allowed : 3 hours**

*सूचना / Note :*

(i) *उमेदवाराने **भाग - 1** मराठी व **भाग- 2** इंग्रजीकरिता **स्वतंत्र उत्तरपुस्तिका** वापरावी.*
*Candidates should use **two separate answerbooks** for **Part - 1** Marathi and **Part-2** English.*

(ii) *सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.*
*All questions are **compulsory**.*

(iii) *प्रश्नासमोरील अंक गुण दर्शवितात.*
*Figure to the RIGHT indicates marks of the respective question.*

(iv) *तर्कसंगत, नेमक्या आणि परिणामकारक लिखाणास यथोचित गुण देण्यात येतील.*
*Credit will be given to correct spelling, punctuation, good handwriting and neatness.*

(v) *उत्तरपुस्तिकेच्या आतील भागात कोठेही उमेदवाराने बैठक क्रमांक, स्वत:चे किंवा इतरांचे नाव, पत्ता किंवा आपली ओळख देणारे चिन्ह नमूद करु नये, अन्यथा तो शिक्षेस पात्र ठरेल.*
*Candidates should not write roll number, any name (including his/her own), signature, address or any indication of his/her identity anywhere inside the answer book otherwise he/she will be penalised.*

(vi) *उमेदवाराने प्रत्येक प्रश्नातील उपप्रश्न यांची उत्तरे एकत्र सोडवावयाची आहेत. उत्तराचा काही भाग किंवा एक उपप्रश्न एकीकडे व दुसरा दुसरीकडे (काही पृष्ठे सोडून वा अन्य प्रश्न सोडवून तद्नंतर) सोडवल्यास दुसरा भाग/ उपप्रश्न दुर्लक्षित केला जाईल.*
*Candidates are expected to answer all the subquestions of a question together. If part of answer or subquestion of a question is attempted elsewhere (after leaving a few pages or after attempting another question) the later shall be overlooked.*

(vii) *उमेदवाराने **भाग - 1** मराठी या उत्तरपुस्तिकेत **भाग - 2** इंग्रजीचा प्रश्न सोडवू नये, तसेच **भाग - 2** चे उत्तरपत्रिकेत **भाग - 1** (मराठी) चे प्रश्न सोडवू नयेत. सोडविल्यास तो दुर्लक्षित केला जाईल.*
*Candidates should not answer Part-1 Marathi Question in Part -2 English answerbook and vice-versa, otherwise it will be overlooked.*

**P.T.O.**

## भाग-1 मराठी ( अनिवार्य ) 50

1. **निबंध लेखन** 25

पुढीलपैकी एका विषयावर (सुमारे **400 शब्द** मर्यादा) एक निबंध लिहावा.

(a) स्त्रीभ्रूण हत्या - एक सामाजिक समस्या

(b) शेतकऱ्याचे मनोगत

2. भाषांतर **(250-300)** 15

(इंग्रजी उताऱ्याचे मराठीत भाषांतर करा)

Modern India is developing fast. The country has opened its doors to multinational companies. So it needs an educated work force. Which knows English. Many educational courses are conducted exclusively in English. Many books, journals, manuals etc. are published only in English. The competitive examinations on the national level in India are conducted in English. So one has to master this language. The knowledge of English has become the need of time.

You are what you think you are. You feel what you want to feel. Do you frequently hear yourself saying or thinking 'I can't ?' If you say or think in this manner, you will soon believe it. It will become a self fulfilling prophecy and you will feel more powerless and out of control.

Adopt turnaround mentality : Belive in yourself and realise that you are a capable person. Give yourself positive, encouraging statements. If your goal requires a response or approval from others.

You can sometimes feel helpless and out of control. Work at feeling good about yourself and become more self reliant. Seek help when you need it. There is immense power in positive thinking. Research proves people who have a sunny, optimistic outlook live longer and recover faster than those who are constantly worrying.

www.mpscmaterial.com www.fb.com/mpscmaterial www.t.me/mpscbooks

3. खाली दिलेल्या उताऱ्याचे 1/3 शब्दात सारांश लेखन करा. उताऱ्यास योग्य शिर्षक द्या. 10

विज्ञान, आत्मज्ञान व साहित्य या जगाच्या जीवनाला आकार देणाऱ्या तीन शक्ती आहेत. विज्ञान ही जगाच्या जीवनाला रूप देते तर आत्मज्ञान हे जीवन – परिवर्तन करते आणि साहित्य संपूर्ण जगाचे परिवर्तन घडवून आणते.

साहित्य ही एक संयोजक शक्ती आहे. तिचे कार्य आतच्या आणि बाहेरच्या जगाला जोडणाऱ्या कडीसारखे असते. ती एक संयोगशील शक्ती असल्यामुळे विज्ञान व आत्मज्ञान यांना एकत्र करते. क्रांतीकारी विचारवंताच्या, साहित्याच्या प्रेरणेनेच जगात मोठमोठ्या क्रांत्या आजवर घडून आल्या आहेत. कारण साहित्य म्हणजे साक्षात सरस्वतीची वाणी आहे. ती लोकांचे अंत:करण निर्मळ व स्वच्छ करते. जगाचे पालनपोषण करण्याचे व जीवनाला सतत सोबत करण्याचे सामर्थ्य साहित्यातच आहे.

या दृष्टीने साहित्यिकांवर फार मोठी जबाबदारी आहे. त्यांनी आपली बुद्धी व वाणी विकली तर संपूर्ण जगाचे जीवन धोक्यात येईल. त्यामुळे साहित्य आणि मानवी मन यांचा अन्योन्य संबंध आहे. याचे कारण म्हणजे मानवी जीवनातूनच साहित्याची निर्मिती होत असते. हजारो वर्षांच्या मानवी जीवन इतिहासाचे अवलोकन केले तर साहित्याचे सामर्थ्य प्रकट होते. भारतीय संतानी विचार प्रेरक साहित्य निर्माण करून उदात्त ध्येयदृष्टीचे आदर्श जीवन उभे केले आहे.

साहित्याच्या ठिकाणी समाजाचे जीवन घडविण्याचे सामर्थ्य आहे. कोणत्याही समाजात घडून येणारी उत्क्रांती ही साहित्याच्या प्रभावामुळेच घडत असते. साहित्याचे सामर्थ्य म्हणजे शब्दांचे सामर्थ्य. बदलत्या समाजजीवनाचे चित्रण साहित्यात उमटले की, साहित्यात नविनता येते व या नव्या साहित्यातूनच प्रेरणा घेऊन पुढे समाजही नवा होतो. म्हणून साहित्य ही एक प्रचंड शक्ती आहे. कारण समाजाला दिशा देण्याचे सामर्थ्य या साहित्यातच आहे.



www.mpscmaterial.com www.fb.com/mpscmaterial www.t.me/mpscbooks

## Part-2 English (Compulsory) 50

1. Write an essay on one topic of about **400** words. 25

   (a) Role of youth in Modern Society.

   (b) Is Money a source of Happiness ?

2. Translation of a Marathi passage into English. 15

शरीर आपण पाहत असतो. मन मात्र मानत असतो. मनामुळे सर्व काही कळते पण मन मात्र पुरते कळत नाही. ते भासते पण दिसत नाही. ते असते पण भेटत नाही. त्याच्याशिवाय आपले पान हलत नाही. जागेपणी ते जग दाखवते. झोपेत ते स्वप्न पाहते. झोपेतून उठल्यावर आपली ओळख पटवते आणि उरल्यासुरल्या आणि संकल्पित कामांची यादी पुढे ठेवते. शरीराला अवयव असतात. इंद्रियांनी ते घडलेले असते. त्याच्या रचनेत पचन, श्वसन, अभिसरण अशा संस्था सहभागी होतात. या संस्था म्हणजे विशिष्ट कार्याला वाहून घेणाऱ्या इंद्रियांचे संवादी समूह असतात. शरीर अभ्यासणे व मार्गी लावणे हे काम सोपे आहे. मन मात्र सदैव कुठे तरी दडून राहते.

काही मानसशास्त्रज्ञ एक विदारक भूमिका घेतात. ती स्वीकारणे सामान्य माणसांना शक्य नसते. ते म्हणतात : मन या नावाची वेगळी गोष्ट नाही. तो एक शब्द आहे. ते एक नाव आहे. उदाहरणार्थ – एखाद्या नावाचे गाव असावे. गावात घरे असावीत, माणसे राहावीत, वाहने आढळावीत, सभा भराव्यात, संस्था चालाव्यात, हे सगळे असावे आणि या सर्वांच्या बेरजेला दिलेले गाव हे एक केवळ नाव असावे. मात्र त्या नावाची स्वतंत्र गोष्ट प्रत्यक्षात नसावी.

काही भारतीय तत्वज्ञ 'मन' हे एक आंतरिक इंद्रिय मानतात. ज्ञानेंद्रिये आणि त्यांचे विषय यात संबंध निर्माण करण्याचे काम मन करते. उदाहरणार्थ – एखादी वस्तू आपण शोधत असतो. ती जवळ आणि समोर असते पण ती नजरेत भरत नाही आणि लक्षातही येत नाही. कारण आपले मन थाऱ्यावर नसते. वस्तू आणि इंद्रिय यांची गाठभेट घडविणारे मन मध्ये पडत नाही तोपर्यंत वस्तुबोध घडत नाही. मन जन्मभर अशी मध्यस्थी करते. माणसाने भूगोलापासून खगोलापर्यंत सगळे जग कॅमेरा हाती घेऊन टिपले. आपलेही अनेक फोटो काढून घेतले. पण त्याच्याजवळ त्याच्या मनाचा फोटो नाही. हे दु:ख त्याने सांगावे कुणाला ? त्याच्या मनाला.

www.mpscmaterial.com www.fb.com/mpscmaterial www.t.me/mpscbooks

3. Precis of the passage in about 1/3 of its original length with a suitable title : 10

Education is not an end but a means to an end. In other words we do not educate children only for the purpose of educating them; the purpose is to make them fit for life. As soon as we realise this fact we will understand that it is important to choose a system of education which will really prepare children for life.

In many modern countries it has for some time been fashionable to think that by free education for all - whether rich or poor, clever or stupid - one can solve all the problems of society and build a perfect nation. But we can already see that free education for all is not enough : we can find in such countries a far large number of people with university degrees than there are jobs for them to fill. Because of their degrees they refuse to do what they think 'low' work ; and in fact work with the hands is thought to be dirty and shameful in such countries.

But we have only to think for a moment to understand that the work of a completely uneducated farmer is far more important than that of a professor. We can live without education, but we die if we have no food. If no one cleaned our streets and took the rubbish away, we would get terrible diseases.

-oOo-

www.mpscmaterial.com www.fb.com/mpscmaterial www.t.me/mpscbooks